# सुचना-रत्नागिरी जिल्हा होमगार्ड सदस्य नोंदणी कार्यक्रम २०२४

रत्नागिरी जिल्हा होमगार्ड सदस्य नोंदणी करीता रत्नागिरी जिल्हयातील ज्या रहिवासी उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज केला आहे त्यांचे करीता खालील प्रमाणे नोंदणी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.**सदर नोंदणी फक्त रत्नागिरी जिल्यातील उमेदवारांकरीता असून इतर जिल्हयातील ऑनलाईन नोंदणी करीता केलेले सर्व अर्ज अपात्र आहेत. त्यामुळे रत्नागिरी जिल्हा सोडून इतर जिल्हयातील उमेदवारांनी नोंदणी कार्यक्रमाकरीता उपस्थित राहू नये. त्यांना मैदानामध्ये प्रवेश दिला जाणार नाही. तसेच रहिवासी भागातील पथक/उपपथक सोडून इतर पथकात अर्ज केलेले उमेदवार सुद्धा कागदपत्र पडताळणी मध्ये अपात्र ठरतील.**

अर्ज केलेल्या उमदवारांना कागदपत्र पडताळणी, शारिरीक पात्रता व क्षमता चाचणी करीता दि.२२/०८/२०२४ व २३/०८/२०२४ या कालावधीमध्ये दररोज सकाळी ०६.३० वा पोलीस मुख्यालय मैदान रत्नागिरी येथे बोलविण्यात येत आहे. उमेदवारांना स.०६.३० ते १०.३० या कालावधीमध्ये मैदानात प्रवेश दिला जाईल.

| अ.क्र. | दिनांक | बोलाविण्यात आलेले अर्ज नोंदणी क्र. | उमेदवार संख्या |
|---|---|---|---|
| १ | २२/०८/२०२४ | पुरुष अर्ज नोंदणी क्र.०१ ते १००० | १००० |
| २ | २३/०८/२०२४ | सर्व महिला/ पुरुष १००१ च्या पुढे | सर्व |

१. कागदपत्र पडताळणी व शारिरीक क्षमता चाचणी करीता येताना अर्जासह आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रती उमेदवारांनी स्वत:स्वाक्षरी करुन अर्जासोबत जोडावी. अर्ज नोंदणीच्या दिवशी स्वत: घेवून यावे. दोन फोटो व मुळ कागदपत्र नोंदणीच्या वेळी पडताळणीकरीता बंधनकारक राहील. नोंदणीकरीता स्व:खर्चाने उपस्थित रहावे लागेल, नोंदणी दरम्यान किंवा प्रवासादरम्यान कोणतीही दुखापत झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील.

२. उमेदवारांना शरिरीक क्षमता चाचणी मध्ये पात्र होणेकरीता प्रत्येक प्रकारामध्ये ४० % गुण मिळविणे आवश्यक राहिल. (धावणे या प्रकारात किमान १० गुण व गोळाफेक या प्रकारात किमान ४ गुण आवश्यक) धावणे चाचणी प्रकारामध्ये अपात्र उमेदवारांनी डिटेल सोबत शेवटपर्यंत थांबावे लागेल व चेस्ट क्रमांक, टोकन इ. जमा केल्याशिवाय जावू नये गेल्यास उमेदवारांवर दंडात्मक कारवाई करणेत येईल याची नोंद घ्यावी.

३. उमेदवारांनी कागदपत्र पडताळणी व मैदानी चाचणीवेळी कोणत्याही किमती वस्तू मोबाईल इ. आणू नयेत आणि आणल्या तर त्या स्वत:च्या जबाबदारीवर सांभाळाव्यात याची कोणतीही जबाबदारी आयोजकांवर रहाणार नाही.

४. पथक निहाय रिक्त अनुशेष खालीलप्रमाणे राहिल.

| अ.क्र. | होमगार्ड पथक/उपपथक | रिक्त जागा | | अंतर्गत पोलीस ठाणे |
|---|---|---|---|---|
| | | पुरुष | महिला | |
| १ | अलोरे | १२ | ०४ | शिरगाव |
| २ | चिपळुण | ७४ | ०९ | चिपळूण |
| ३ | दापोली | २६ | ०४ | दापोली, दाभोळ |
| ४ | देवरुख | १४ | ०५ | देवरुख |
| ५ | गुहागर | ० | ०८ | गुहागर |
| ६ | खवटी | ११ | ०० | खेड |
| ७ | खेड | ६७ | १० | खेड |
| ८ | लांजा | ३५ | ०३ | लांजा, नाटे |
| ९ | मंडणगड | २७ | ०८ | मंडणगड |
| १० | पोफळी | ०४ | ०० | सावर्डे |
| ११ | राजापूर | २० | ०६ | राजापूर, नाटे |
| १२ | रत्नागिरी | १३१ | १४ | रत्नागिरीशहर,रत्नागिरी ग्रामीण,जयगड,पूर्णगड |
| १३ | साखरपा | ०९ | ०५ | संगमेश्वर |
| | एकूण | ४३० | ७६ | |

सदर होमगार्ड नोंदणी प्रक्रिया अंतर्गत अत्यंत पारदर्शक व इन-कॅमेरा पार पाडणेत येणार असून होमगार्ड नोंदणी करीता उमेदवारांनी कोणत्याही अमिषाला बळी पडू नये.तसेच शिफारस / वशिला इ.गैरमार्गाचा वापर करू नये. होमगार्ड नोंदणी करीता कोणी पैसे /लाचेची मागणी केल्यास तात्काळ मा.अपर पोलीस अधीक्षक, रत्नागिरी किंवा कधीक्षक, लाचलूचपत प्रतिबंधक कार्यालय रत्नागिरी यांचेकडे दूरध्वनी क्रमांक-०२३५२-२२२८९३ या क्रमांकावर तक्रार करावी.

अतिवृष्टीमुळे वेळापत्रकात बदल झाल्यास त्याची सूचना https://maharashtracdhg.gov.in/mahahg/enrollmentadd.php या संकेतस्थळावर वेळोवेळी देण्यात येईल त्यामुळे उमेदवारांनी सदर संकेतस्थळावरील सुचनांकरीता अद्यावत रहावे. होमगार्ड नोंदणी प्रक्रियेचा निकाल वरील संकेतस्थळावरती १२/०९/ २०२४ पर्यंत जाहिर केला जाईल.

टिप- होमगार्ड नोंदणी प्रक्रियेत बदल करण्याचे प्राधिकार मा.जिल्हा समादेशक होमगार्ड रत्नागिरी यांचेकडे राहतील.

मा.अपर पोलीस अधीक्षक तथा
जिल्हा समादेशक,होमगार्ड रत्नागिरी
यांचे आदेशान्वये.